॥हरि ॐ॥

# आदिमाता महिषासुरमर्दिनी चण्डिकेची आरती

**ॐ माते गायत्री, सिंहारूढ भगवती - महिषासुरमर्दिनी, क्षमस्व चण्डिके ।**
**जय दुर्गे, अखिल विश्व की जननी माँ उदे, उदे, उदे, उदे, उदे ॥१॥**
**प्रतिपदा, घोररूप महाकाली - असुरों को भयकारी, रक्ष चण्डिके**
**जय दुर्गे, अखिल विश्व की जननी माँ उदे, उदे, उदे, उदे, उदे ॥२॥**
**द्वितीया, कनकांगी महालक्ष्मी - सर्वविघ्ननाशिनी, रक्ष चण्डिके**
**जय दुर्गे, अखिल विश्व की जननी माँ उदे, उदे, उदे, उदे, उदे॥३॥**
**तृतीया, महासरस्वती राज्ञी - सर्वरोगनाशिनी, रक्ष चण्डिके**
**जय दुर्गे, अखिल विश्व की जननी माँ उदे, उदे, उदे, उदे, उदे ॥४॥**
**चतुर्थी, रक्तदन्तिका योगिनी - असुररक्तप्राशिनी, रक्ष चण्डिके**
**जय दुर्गे, अखिल विश्व की जननी माँ उदे, उदे, उदे, उदे, उदे ॥५॥**
**पंचमी, नीलवर्ण शताक्षी - अन्नजलदायिनी, रक्ष चण्डिके**
**जय दुर्गे, अखिल विश्व की जननी माँ उदे, उदे, उदे, उदे, उदे ॥६॥**
**षष्ठीते, श्रीरामवरदायिनी - अशुभनाशिनी, रक्ष चण्डिके**
**जय दुर्गे, अखिल विश्व की जननी माँ उदे, उदे, उदे, उदे, उदे ॥७॥**
**सप्तमी, नन्दिनी गर्भदायिनी - श्रीकृष्णतारिणी, रक्ष चण्डिके**
**जय दुर्गे, अखिल विश्व की जननी माँ उदे, उदे, उदे, उदे, उदे ॥८॥**
**अष्टमी, दत्तमंगला चण्डिका - श्रीगुरूभक्तिरूपा, रक्ष चण्डिके**
**जय दुर्गे, अखिल विश्व की जननी माँ उदे, उदे, उदे, उदे, उदे ॥९॥**
**नवमी, नित्या मन्त्रमालिनी - कलिमलहारिणी, रक्ष चण्डिके**
**जय दुर्गे, अखिल विश्व की जननी माँ उदे, उदे, उदे, उदे, उदे ॥१०॥**
**कृपा करो, अशुभ हरो- हे वज्रमंडलराज्ञी, रक्ष चण्डिके ।**
**जय दुर्गे, अखिल विश्व की जननी माँ उदे, उदे, उदे, उदे, उदे ॥११॥**

॥हरि ॐ॥

# श्री मंगलचण्डिका प्रपत्ती

## प्रपत्ती केल्यानंतर होणारे फायदे

१) ही प्रपत्ती प्रत्येक स्त्रीला पराक्रमी सैनिक, प्रापंचिक बनविणारी व पराक्रमी आध्यात्मिक बनवणारी आहे.

२) प्रपत्तीचा सरळ अर्थ असा आहे की, आपत्तिनिवारण करणारी शरणागती.

३) श्री मंगलचण्डिका प्रपत्तीमुळे प्रत्येक स्त्री तिच्या कुटुंबाची रक्षणकर्ती सैनिक बनते. तसेच प्रत्येकाची 'बॉडीगार्ड' बनते. मग ती कोणत्याही भूमिकेत असो, आई असो, पत्नी असो ती तिच्या संपूर्ण घराची रक्षणकर्ती बनते.

४) हे व्रत करणाऱ्या सर्व स्त्रिया अबला राहणार नाहीत, त्या दुर्बल राहणार नाहीत, त्या आदिमाता चण्डिकेच्या सैनिक बनतील; तसेच त्या स्वत:च्या गृहरक्षणासाठी, स्वत:च्या आप्तांच्या रक्षणासाठी, स्वत: समर्थ बनतील.

५) हे व्रत करताना स्त्री जेव्हा फक्त कुटुंबासाठी मागते म्हणजे कुटुंबाची रक्षणकर्ती बनण्याची इच्छा ठेवते तेव्हा ती कुटुंबाची रक्षणकर्ती बनते, तसेच जेव्हा ती कुटुंब, देश आणि धर्म ह्या तिन्हींच रक्षण करण्याची इच्छा ठेवते तेव्हा ती ह्या तिन्हींचं रक्षण करणारी सैनिक बनते.

६) ही प्रपत्ती केल्याने स्त्रियांना 'स्त्री प्रकारची ताकद' प्राप्त होईल. त्या पुरूषी बनणार नाहीत, त्या स्त्रियाच असतील. त्या अतिशय कोमलच असतील, त्यांचं सौंदर्य वाढेल पण तरीही त्या खंबीर रक्षणकर्त्या बनतील. हे श्री मंगलचण्डिका प्रपत्ती केल्यानंतर त्यांच्या लक्षात येईल.

## श्री मंगलचण्डिका प्रपत्ती करण्याचा विधी

१) स्त्रियांनी ही प्रपत्ति मोकळ्या जागेत करावी, त्यामुळे त्यांची संवेदनक्षमता, ग्रहणक्षमता वाढेल.

२) सर्व स्त्रियांनी तबकातील द्रव्यासकट उभे राहून श्री माता चण्डिकेची (श्री महिषासुरमर्दिनी) आरती करावी. आरती फक्त वयोवृद्ध स्त्री करेल.

३) प्रत्येक स्त्रीने तबकासह चण्डिकेच्या पदचिह्नस्थानास फेर धरल्याप्रमाणे 'श्रीगुरुक्षेत्रम् मन्त्र' मोठ्याने म्हणत नऊ प्रदक्षिणा कराव्यात.

४) प्रदक्षिणा पूर्ण झाल्यानंतर अभिचारनाशक पुरचुंडीने (अभिचार म्हणजे ज्याला आपण करणी करण्यापासून दृष्ट लागण्यापर्यंत जे काही म्हणतो ते कुकर्म. ते सगळं कुकर्म म्हणजे अभिचार आणि पुरचुंडी कसली? तर अभिचारनाशक) त्रिविक्रमाची दृष्ट काढावी आणि त्याला सांगायचे की 'बाबारे माझ्या घरावर असणारी कुठलीही कुदृष्टी, कुबुद्धी ह्या सगळ्यांचा तू तुझ्या आईच्या सहाय्याने नाश कर, तू माझ्या घराला लागणारी सर्व बाधा दूर कर.'

५) मग ही पुरचुंडी अग्नीमध्ये अर्पण करावी. गुरुक्षेत्रम मंत्रामुळे त्या अग्नीचं रुपांतरण तेजोवलयम्‌मध्ये होते. आपल्या घरावर असलेली कुदृष्टी, कुबुद्धी, कुकर्म ह्या तेजोवलयम्‌मध्ये गेल्यामुळे आपल्या घराचं कल्याणच होईल.

६) पूजा झाल्यानंतर 'ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चे' हा मंत्र ९ वेळा म्हणत सर्व स्त्रियांनी श्री चण्डिकेच्या पदचिह्नांवर अक्षता वाहाव्यात. तसेच त्रिविक्रमास सुगंधी फुले अर्पण करावीत.

७) नंतर जमलेल्या सर्व स्त्रियांनी त्या पदचिह्नांतील हळद-कुंकू घरी न नेता स्वत:च्या कपाळाला किंवा गळ्याला तिथल्या तिथे लावून घ्यावे.

---

## श्रद्धावान स्त्रियांनी घरुन आणावयाचे साहित्य

**१) अभिचारनाशक पुरचुंडी :** विड्याची पाने, मीठ, मोहरी, कापूर, दोरा.
विड्याच्या पानांमध्ये थोडे मीठ, मोहरी व कापूर घालून कोणत्याही दोऱ्याने बांधावे.

**२)** तबक किंवा ताट, शेवग्याच्या शेंगा, दही, केळी (एक), काकडी किंवा दुधी, नारळ, गाजर, मुळा किंवा तोंडली, उडदाची डाळ, तिळाचे तेल, हळद (हळकुंड नव्हे), आलं, गुळ, चिंच, ऊसाचे कांडे आणि सुंगधी फुले (देवीला अर्पण करण्यासाठी).

**टीप :**

**क)** दुधी/काकडी, शेवग्याच्या शेंगा हे एका तबक/ताटात राहतील अशा वजनाच्या किंवा आकाराच्या असाव्यात.

**ख)** तिळाचे तेल छोट्या बाटलीतून आणावे. तेलासाठी छोटी वाटी आणावी.

**ग)** दही उभ्या डब्यातून आणावे. दही ठेवण्यासाठी छोटी वाटी आणावी.

**इतर सूचना :**

✼ सोळ्या वर्षांवरील कुठलीही स्त्री या प्रपत्तीमध्ये सहभागी होऊ शकते. ✼ प्रपत्तीसाठी श्रद्धावान स्त्रियांनी केसावरून आंघोळ करणे आवश्यक आहे. (सकाळी केली असेल तरी चालेल) ✼ मासिक धर्म असल्यास त्या स्त्रीने स्वत:च्या नाभीला व जीभेला उदी लावून पूजा करणे. ✼ देवीसमोर ठेवलेले केळं प्रसाद म्हणून तेथेच खावे. ✼ दही घरी नेऊन घरातील पुरुषांना प्रसाद म्हणून द्यावे, स्त्रीयांनी खाऊ नये. ✼ ऊस स्त्रियांनी घरी नेऊन स्वत: खावा व इतर स्त्रियांना द्यावा. (त्यादिवशी थोडा तरी खावा) ✼ तबकातील उरलेल्या सर्व साहित्यांचे (केळी, दही, सुगंधी फुले सोडून) साबांर करून ते रात्री घरातील सर्वांनी पोळी किंवा भाताबरोबर खावे. साबांरसाठी मसाला वापरण्यास हरकत नाही पण कडीपत्ता जरूर वापरावा. मात्र ह्या दिवशी कुठलीही भाजी करू नये. कांदा, लसूण वापरण्यास हरकत नाही. ✼ घरामध्ये एकापेक्षा जास्त स्त्रिया असतील तर प्रत्येकाचे साहित्य, तबक वेगळे असावे. ✼ सर्व स्त्रियांनी श्रद्धावानाचा वेष परिधान करावा. (साडी/पंजाबी ड्रेस आणि उपरणे).

# श्रीगुरुक्षेत्रम् मंत्र

**॥ॐ श्रीदत्तगुरुवे नम:॥**

## श्रीगुरुक्षेत्र-बीजमन्त्र

**ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चे-सर्वबाधाप्रशमनं-श्रीगुरुक्षेत्रम्।**
**ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चे-सर्वपापप्रशमनं-श्रीगुरुक्षेत्रम्।**
**ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चे-सर्वकोपप्रशमनं-श्रीगुरुक्षेत्रम्।**
**ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चे-त्रिविक्रमनिलयं-श्रीगुरुक्षेत्रम्।**
**ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चे-सर्वसमर्थं सर्वार्थसमर्थं-श्रीगुरुक्षेत्रम्॥**

## श्रीगुरुक्षेत्र-अंकुरमन्त्र

**ॐ रामात्मा-श्रीदत्तात्रेयाय नम:।**
**ॐ रामप्राण-श्रीहनुमन्ताय नम:।**
**ॐ रामवरदायिनी-श्रीमहिषासुरमर्दिन्यै नम:।**
**ॐ रामनामतनु-श्रीअनिरुद्धाय नम:॥**

## श्रीगुरुक्षेत्र-उन्मीलन मन्त्र (कलिकापुष्पफलमन्त्र)

**ॐ मानवजीवात्मा-उद्धारक-श्रीरामचन्द्राय नम:।**
**ॐ मानवप्राणरक्षक-श्रीहनुमन्ताय नम:।**
**ॐ मानववरदायिनी-श्रीआह्लादिन्यै नम:।**
**ॐ मानवमन:सामर्थ्यदाता-श्री अनिरुद्धाय नम:॥**

---

**'ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चे'**